नांदेड जिल्ह्यातील कंधार व लोहा तालुक्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

मदत व पुनर्वसन विभाग

शासन निर्णय क्रमांक- एफएलडी-२०२६/प्र.क.२३(ई-१६५७८२३)/पुनर्वसन-०७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक - २२ जुलै, २०२६

वाचा:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.आरपीए २००८/प्र.क्र.५५०/र-१, दि.०१.०८.२००९

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. ०१११/प्र.क्र.१८/र-१, दि.२८.०३.२०११

३) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.०४.२०१५

४) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र २०१५/प्र.क्र.२०/२०१५/विनियम, दि.१९.०१.२०१६

५) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. विअसु २०१५/ प्र.क्र.२१८/ इमारती-२, दि.१६.१२.२०१५

६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एफएलडी-२०१९/प्र.क्र.१२९/२-१२, दि.१४.१०.२०२२

७) शासन शुद्धीपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.एफएलडी-२०१९/प्र.क्र.१२९(E-१४५३८४३)/ पुनर्वसन-०७, दि.०९.०६.२०२६

८) जिल्हाधिकारी, नांदेड यांचे ई ऑफीस पत्र क्र. NANDED-३३०२(१)/३८/२०२५-NAN-DRO, I/२११०३००/२०२६, दि.०८.१२.२०२५

प्रस्तावना:-

नांदेड जिल्ह्यातील कंधार व लोहा तालुक्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांतील नागरी सुविधा कामांची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेस्तव जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संदर्भाधीन क्र. ८ येथील पत्रान्वये शासनास सादर केली आहेत.

२. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अनुसार योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरुन) मान्यता देण्याबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून प्राप्त प्रस्तावातील नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

नांदेड जिल्ह्यातील पुरामुळे पुनर्वसित झालेल्या गावांतील पुढील तक्त्यात नमूद नागरी सुविधा कामांच्या एकूण रूपये २८,९५,६४,०००/- (अक्षरी रुपये अठ्ठावीस कोटी पंच्याण्णव लक्ष चौसष्ट हजार फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांना पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. पुढील तक्त्यात नमूद पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांचा सविस्तर तपशिल "परिशिष्ट अ" मध्ये नमूद केला आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र.	गावाचे नाव	नागरी सुविधा काम	अंदाजपत्रकीय रक्कम
ता. कंधार, जि. नांदेड			
१	तेलुर	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	३९९.०६
२	शिरुर जुने	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	२९९.७८
३	शिरुर नविन	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	२९९.२८
४	कौठा	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	४९९.००
५	चौकी महाकाय	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	२९९.३२
ता. लोहा, जि. नांदेड			
६	अंतेश्वर	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	२९९.८७
७	भारसवाडा	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	२९९.७१
८	पेनूर	गावांतर्गत सी.सी. रस्ते/ बंदिस्त नाली	४९९.६२
		एकूण	**२८९५.६४**

अटी व शर्ती :-

१) नागरी सुविधा कामे करताना प्रस्तुत प्रस्तावित समाविष्ट असलेले गौण खनिज स्वामीत्वधनाची वसूली करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जीटीएन १०८३/२१७/र-१२, दि.१०.०२.१९८३, शासन निर्णय क्र. आरसीपीए २००८/प्र.क्र.५५०/र-१, दि. ०१.०८.२००९ व शासन परिपत्रक क्र. आरपीए ०१११/प्र.क्र.१८/र-१, दि. २८.०३.२०११ अन्वये पुनर्वसित/ विस्तारित गावठाणांतील नागरी सुविधा पुरविण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या भौतिक मानकांनुसार तपासणी करुन काम करुन घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांची राहील.

३) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांवर होणारा खर्च मंजूर अंदाजपत्रकांतील रकमेपेक्षा विहित मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही, याची संबंधित मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

४) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांसाठीच्या अंदाजपत्रकांत दर्शविलेली कामनिहाय रक्कम तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेतील अटींचे विहित कार्यपध्दतीनुसार पालन होईल, याची संबंधित कार्यान्वयन यंत्रणेच्या संबंधित मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व संबधित कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी प्रस्तावाधीन नागरी सुविधा सर्व दृष्टीने पूर्ण झाल्यावर व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतर संबंधित जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित कराव्यात व त्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांचेमार्फत शासनाच्या पुनर्वसन विभागास अवगत करावे.

६) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यनियमावलीतील प्रचलित नियमांनुसार सदर नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांस संबंधित कार्यान्वयन यंत्रणेच्या मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली असावी.

७) पुनर्वसन योजनेतून पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधा अन्य योजनेतून पुनश्च: पुरविल्या जाणार नाहीत, नागरी सुविधा कामे यापूर्वी अन्य कोणत्याही योजनेतून करण्यात आलेली नाहीत. अथवा सदरची कामे अन्य योजनेत समाविष्ट नाहीत, तसेच या कामांवर यापूर्वी खर्च करण्यात आलेला नाही, याची संबंधित विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी.

८) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांचा उचित दर्जा राखला जाईल, याची संबंधित मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

९) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी प्रस्तुत प्रशासकीय मान्यता आदेशांतील अटींची पूर्तता पूर्ण करुन प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामे तात्काळ सुरु करावीत व १८ महिन्यांच्या कालमर्यादेत पूर्ण करावीत.

२. निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश:- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी प्रस्तुत प्रशासकीय मान्यता आदेशातील अटींची पुर्तता करून प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करावी. तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदा प्राप्त कामांसाठीचे कार्यारंभ आदेश देऊन नागरी सुविधा कामे तात्काळ सुरु करावीत व १८ महिन्यांच्या कालमर्यादेत पूर्ण करावीत.

३. संबंधित कार्यान्वयन यंत्रणेच्या कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी वरीलप्रमाणे नमूद केल्यानूसार सुरु करण्यात आलेल्या नागरी सुविधा कामांच्या प्रगतीचा अहवाल/ खर्चाच्या प्रगतीचा अहवाल इ. सादर करुन कामाच्या प्रगतीनूसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाच्या कालावधीत सदर कामे पूर्ण करण्याच्या नियोजनानूसार खर्च “मागणी क्रमांक-सी ६, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य (९३) इतर, (९३)(०५) पुरामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणी पुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा, नागरी सुविधावरील खर्च (अनिवार्य) (दत्तमत) (२२४५ ०९८८) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली आवश्यक निधीची मागणी शासनास सादर करावी.

४. त्या अनुषंगाने मंजूर व उपलब्ध तरतुदीतून आवश्यक तेवढा निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर वितरीत करण्यात येणारा निधी ज्या कामासाठी उपलब्ध करुन दिला जाईल त्याच कामासाठी त्याचा विनियोग करण्यात यावा. तसेच वितरीत करण्यात येणा-या निधीच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates),सदर कामे अन्य कोणत्याही योजनेतील निधीतून पूर्ण केलेले नसल्याचे प्रमाणपत्र व काम पूर्ण झाल्यावर Geo-tagging करुन त्याचे प्रमाणपत्र प्राथम्याने सादर करावीत.

५. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय, क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२ दि.१७/०४/२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-तीन अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७(२) (अ) अन्वये प्राप्त अधिकारात व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२२१४३८००४६४१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2026.07.22 14:39:32 +05'30'

(सं. मा. जगताप)
कार्यासन अधिकारी, मदत व पुनर्वसन विभाग

प्रत-

१. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, नांदेड
२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
३. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ / नागपूर-२
६. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई -१/ नागपूर-२
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
८. वित्त विभाग, कार्यासन व्यय ९/अर्थसंकल्प ६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९. कार्यासन अधिकारी, कार्या.ब-१/ पी.ए.सी./ मदत-३, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवड नस्ती, कार्यासन पुनर्वसन-०७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

***

परिशिष्ट अ

१. मौजे तेलूर ता. कंधार जि. नांदेड				
अ.क्र.	पासून	पर्यंत	सी.सी.रस्ता (मी.)	सी.सी.नाली (मी.)
१	भुजंग नागोराव यांचे घर	नारायण काकडे यांचे घर	९०.००	९०.००
२	भुजंग कावूटकर यांचे घर	नारायण काकडे यांचे घर	६०.००	६०.००
३	रमेश कावूटकर यांचे घर	सुर्यकांत हंगीरगे यांचे घर	९०.००	९०.००
४	सुर्यकांत आनंदा यांचे घर	मारुती उडेवाड यांचे घर	९०.००	९०.००
५	सांता सातवा यांचे घर	माणिक डुबुकवाड यांचे घर	३०.००	३०.००
६	आनंदा लक्ष्मण यांचे घर	धुरपताबाई बामणवाड यांचे घर	१३५.००	१३५.००
७	अशोक डुबुकवाड यांचे घर	बालाजी डुबुकवाड यांचे घर	९५.००	९५.००
८	मारोती नामदेव कांबळे यांचे घर	मारोती नागोरा उदेवाड यांचे घर	१५९.००	१५९.००
९	गौतम खांडू वाघमारे यांचे घर	शेषेराव मरीबा वाघमारे यांचे घर	९०.००	९०.००
१०	एकनाथ शंकर डुबुकवाड यांचे घर	शेषराव कोडिंबा भंडारे यांचे घर	१३५.००	१३५.००
११	दत्तमंदिर	स्मशानभूमी	१३५.००	१३५.००
एकूण लांबी			**११०९.००**	**११०९.००**

२. मौजे शिरुर (जुने) ता. कंधार जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	बळवंत गोविंदराव जाधव यांचे घर	बालाजी बापूसाहेब जाधव यांचे घर	१००.००	१००.००
२	माधव केरबा कातुलकर यांचे घर	मौजे कौठा मुखेड रोड पर्यंत	८०.००	८०.००
३	संजय गोविंदराव वाजे यांचे घर	गोविंद त्र्यंबा भोप्राड यांचे घर	५५.००	५५.००
४	खुशाबा रावसाहेब जाधव यांचे घर	मनोहर शंकर गायकवाड यांचे घर	४५.००	-
५	मोहन बाजीराव जाधव यांचे घर	उत्तम मोतीराम जाधव यांचे घर	४०.००	-
६	बापूराव मारोती जाधव यांचे घर	मारूती मंदिर	६०.००	-
७	पाण्याची टाकी	पोचमाई मंदिर	१०५.००	-
८	हनुमान मंदिर	जिल्हा परिषद शाळा	२००.००	२००.००
९	मोहन बाजीराव जाधव यांचे घर	गंगाधर मारोती जाधव यांचे घर	९०.००	-
१०	रणजित केरबा कातकर यांचे घर	व्यंकटी कोंडिबा कातुलकर यांचे घर	४५.००	-
११	जिंग्याचा मारुती पासून	मोहन बाजीराव जाधव यांचे घरापर्यंत	२६१.००	-
एकूण लांबी			**१०८१.००**	**४३५.००**

३. मौजे शिरुर (नवीन) ता. कंधार जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	सुधाकर शंकरराव जाधव यांचे घर	मोतीराम मारोती जाधव यांचे घर	७०.००	७०.००
२	केरबा कोंडिबा काळकेकर यांचे घर	शिवाजी विठ्ठल हट्टे यांचे घर	७०.००	७०.००
३	आदिनाथ दादाराव शिंदे यांचे घर	बाबुराव शिंदे यांचे घर	१३५.००	–
४	आदिनाथ दादाराव शिंदे यांचे घर	पंढरी दशरथ जाधव यांचे घर	५०.००	५०.००
५	मुख्य रस्त्यापासून	स्मशानभूमी पर्यंत	३००.००	२००.००
६	सुभाष गोविंद पंडितराव यांचे घर	अशोक गोविंद पंडितराव यांचे घर	३०.००	–
७	विठ्ठल भोजू जाधव यांचे घरापासून	नामदेव सदाशिव जाधव यांचे घर	९०.००	–
८	ग्रामपंचायत जागा (प्लॉट)	स्मशानभूमी पर्यंत	३०.००	–
९	रोहिदास पंढरीनाथ जाधव यांचे घर	जी. पी. जागेपर्यंत	७५.००	७५.००
१०	मोहम्मद साद यांचे घर	जी.पी. जागेपर्यंत	३०.००	३०.००
११	लक्ष्मण शंकर यांचे घरापासून	जी.पी. जागेपर्यंत	३०.००	–
१२	बालाजी मारुती ढगे यांचे घर	किसन चिमणाजी पंडितराव यांचे घर	३०.००	–
१३	किसन चिमणाची पंडितवाडी यांचे घर	इलेक्ट्रीक डीपी पर्यंत	६०.००	६०.००
१४	गणपती माधव पंडितवाड यांचे घर	जी.पी. जागेपर्यंत	९०.००	९०.००
१५	शिवाजी महाराज पुतळ्यापासून	नागोराव नरहरी जाधव यांचे घर	३३.००	३३.००
एकूण लांबी			**११२३.००**	**६७८.००**

४. मौजे कौठा ता. कंधार जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	रुपेश येरावर यांचे घर	शिवकुमार देशमुख यांचे घर	२१०.००	–
२	माधव देवडे यांचे घर	मुख्य रस्त्यापर्यंत	७५.००	७५.००
३	प्रकाश टिपाजी हट्टे यांचे घर	देविदास सोंडगे यांचे घर	१००.००	–
४	संजय देशमुख यांचे घर	मनोज येरंडे यांचे घर	७५.००	–
५	धुरपत माता मंदिरापासून	स्मशानभूमी पर्यंत	१२०.००	–
६	प्रभाकर संग्राम हट्टे यांचे घर	लतीफ सय्यद यांचे घर	४०.००	–
७	माधव आपाराव पावडे यांचे घर	कॅनल रोड पर्यंत	४५०.००	४५०.००
८	वेंकटी मारोती पोतदार यांचे घर	रविराज देशमुख यांचे घर	२००.००	२००.००
९	वामन संभाजी वाघमारे यांचे घर	जि.प. शाळेपर्यंत	२२५.००	२२५.००
१०	मरिबा घोरपडे यांचे घर	कौठा धानोरा रोड पर्यंत	८०.००	८०.००
११	बापुराव कंगणाजी वाघमारे यांचे घर	कौठा धानोरा रोड पर्यंत	१८०.००	१८०.००

४. मौजे कौठा ता. कंधार जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१२	बालाजी वाघमारे यांचे घर	कौठा धानोरा रोड पर्यंत	२२०.००	२२०.००
१३	मंजुळाबाई देवबा सरोदे यांचे घर	विठ्ठल देवबा सरोदे यांचे घर	१००.००	१००.००
१४	वेंकटी घोरपडे यांचे घर	मरिबा कांबळे यांचे घर	४५.००	४५.००
१५	बालाजी घोरपडे यांचे घर	जाळबा घोरपडे यांचे घर	५५.००	५५.००
१६	गौतम वाघमारे यांचे घर	दत्ता वाघमारे यांचे घर	८३.००	८३.००
एकूण लांबी			**२२५८.००**	**१७१३.००**

५. मौजे चौकी महाकाय ता. कंधार जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
1	किशन दौलत कांबळे यांचे घर	नासरजंग (मुकीम देव) यांचे घर	७५.००	७५.००
2	सुधाकर पांडुरंग यांचे घर	शिवाजी भुजंगा हिवराळे यांचे घर	७५.००	७५.००
3	पांडुरंग सोन्या पवार यांचे घर	भीमराव रामराव ते पांढुर्णीकर यांचे घर	१८५.००	१८५.००
4	रामराव हरी राठोड यांचे घर	रविदास रामधन पवार यांचे घर	७५.००	७५.००
5	प्रल्हाद हरी पवार यांचे घर	सुधाकर नवघरे यांचे घर	७५.००	७५.००
६	अशोक बांदेवारो यांचे घर	भानुदास सोनकांबळे यांचे घर	१८५.००	१८५.००
७	शंकर नागोराव सूर्यवंशी यांचे घर	भीमराव रामराव पांडुर्णी यांचे घर	२७०.००	२७०.००
८	भानू तुकाराम राठोड यांचे घर	नामदेव गणपती कदम यांचे घर	१५०.००	१५०.००
एकूण लांबी			**१०९०.००**	**१०९०.००**

६. मौजे अंतेश्वर ता. लोहा जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	विक्रम पांडुरंग कऱ्हाळे यांचे घर	अनंत ऋषी मंदिर पर्यंत	९०.००	९०.००
२	गंगाधर सखाराम कऱ्हाळे यांचे घर	पुंडलिक बबन बोराळे यांचे घर	१००.००	१००.००
३	दत्तराम बुवा गिरी यांचे घर	पोचमन्ना मंदिर पर्यंत	४९२.००	४९२.००
४	अच्युत अर्जुन कऱ्हाळे यांचे घर	नरहरी पांचाळ यांचे घर	६०.००	-
५	सुदाम रावसाहेब कऱ्हाळे यांचे घर	परबता बापूराव कऱ्हाळे यांचे घर	९०.००	९०.००
एकूण लांबी			**८३२.००**	**७७२.००**

७. मौजे भारसवाडा ता. लोहा जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	मुख्य रस्ता आडगाव- अंतेश्वर पासून	गोरखनाथ बालाजी येडके यांचे घर	४५०.००	४५०.००
२	छत्रपती दिनाजी येडके यांचे घर	दिनाजी जाल्बाजी कऱ्हाळे यांचे घर	१२८.००	-
एकूण लांबी			**५७८.००**	**४५०.००**

८. मौजे पेनूर ता. लोहा जि. नांदेड				
अ. क्र.	पासून	पर्यंत	सी.सी. रस्ता (मी.)	सी.सी. नाली (मी.)
१	मुख्य रस्त्यापासून	शिवाजी पुतळा ते जिल्हा परिषद शाळा	७००.००	७००.००
२	चंद्रकांत पिराजी गव्हाते यांचे घर	एकनाथ पांडुरंग लोखंडे यांचे घर	३२३.००	३२३.००
३	रामदास पाटील गव्हाते यांचे घर	शिवराज हनुमंत अराळे यांचे घर	१८६.००	१८६.००
एकूण लांबी			**१२०९.००**	**१२०९.००**